महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

निर्णय क्र. मविनिआ/माअअ/अपील/०४/२०२०/ **३०३** दिनांक-३०.०७.२०२०

| | |
|---|---|
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | :१८.०२.२०२० |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक | :०६.०३.२०२० |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | :३०.०६.२०२० |
| प्रथम अपील निकाली काढल्याचा दिनांक | :३०.०७.२०२० |

**समक्ष प्रथम अपीलीय अधिकारी**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**(माहिती अधिकारी अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत.)**

**<u>अपील क्र. ०४/२०२०</u>**

**अपीलकर्ता:** श्री. ब्रिजमोहन धिरजप्रसाद मिश्रा

**विरुदध**

**प्रतिवादी :** जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई

**अपिलाचे तथ्य :-**

१) अपिलकर्ता यांनी दिनांक १८.०२.२०२० रोजी माहिती अधिकार कायद्याअंर्तगत अर्ज केला. त्यानुसार प्रतिवादी यांनी दिनांक ०६.०३.२०२० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली. त्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी दिनांक ३०.०६.२०२० रोजी वरील अपिल दाखल केले आहे.

२) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिनांक ०३.०७.२०२० रोजी नोटिस पाठवून दिनांक १७.०७.२०२० रोजी सुनावणी आयोजीत केली होती परंतु, सुनावणी च्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर होते व माहिती अधिकारी हे हजर होते. माहिती अधिकारी यांनी आपले मौखिक निवेदन सादर केले.

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
Tel.: 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 Fax : 022-2216 3976
E-mail : mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in Website : www.merc.gov.in / www.mercindia.org.in

**३) अपिलातील दस्तऐवज व निवेदनावरुन अपिलातील मुदद्दे खालील प्रमाणे आहेत -**

**<u>मागितलेली माहिती:-</u>**

१) वीज नियामक आयोग म. रा. यांच्या दि. २२ जानेवारी, २०२० रोजीच्या अहवालाची सत्यप्रत,
२) सदर वर्कींग ग्रुप ने चौकशी कामी ताब्यात घेतलेल्या कागदपत्रांच्या सत्यप्रती,
३) सदर working Group च्या २२ जानेवारी, २०२० च्या अहवालानुसार दोषी विरूध्द कार्यवाहीसाठी केलेल्या पत्रव्यवहाराच्या सत्यप्रती.

**<u>जन माहिती अधिकारी यांचे उत्तर :-</u>**

आपणास हव्या असलेल्या माहितीचा तपशील अपूर्ण असल्याने आपणास नेमकी कोणती माहिती पाहिजे याचे आकलन होत नाही. त्यामुळे आपणास माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. (आपणास हव्या असलेल्या माहिती संदर्भात योग्य व पूर्ण माहितीचा तपशील अर्जात नमूद करुन पुन्हा अर्ज करु शकता किंवा आपण प्रत्यक्ष कार्यालयात उपस्थित राहून कळवावे) जेणे करुन आपणांस माहिती उपलब्ध करुन देणे सोयीस्कर होईल.

**<u>प्रथम अपील दाखल करण्याचे कारण :-</u>**

माहिती अधिकाऱ्याने त्याचे ताब्यातील उपलब्ध माहिती दिल्यास हजारो कोटीचा घोटाळा उघडकिस येईल व त्यांच्यामुळे दोषींवर दिवाणी, फौजदारी कारवाईसह अपऱ्हत रक्कम वसूलीची कारवाई होईल म्हणून दोषींना वाचविणेकामी व दोषींना न्यायाच्या कोर्टात शिक्षा होऊ नये म्हणून दोषींच्या गुन्ह्याला लपविणे कामी मला दि.०६.०३.२०२० च्या उत्तरात चुकीचे कारण देउन माझा अर्ज स्पष्ट माहितीचा उल्लेख असतानाही दोषींच्या संगनमताने मला माहिती पासून वंचीत ठेवले आहे. त्यामुळे व्यथीत होउन मी प्रथम अपील करीत आहे. तरी दोषींना आश्रय देउन त्यांच्या गुन्ह्यावर पांघरूण् घालण्याऱ्या माहिती अधिकाऱ्यावर दंडासह शस्तीची कारवाई करावी, कारण त्याच्या कर्तव्यातील कसूरीमुळे त्रास सहन करावा लागत आहे. अर्जातील मजकुर समजुन देखील अपूर्ण आहे असे म्हणणे गंभीर बाब आहे.

**<u>अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्ये :-</u>**

माहिती अधिकारी यांनी आपणास दिनांक ०६.०३.२०२० रोजीच्या पत्रात कळविल्याप्रमाणे आपण दिनांक ११.०३.२०२० रोजी अन्वये पुन्हा माहिती अधिकारा अंतर्गत सुधारीत माहितीचा अर्ज केलेला होता. सदर अर्ज माहिती अधिकारी यांना दिनांक १६.०३.२०२० रोजी कार्यालयास प्राप्त झाले. सदर अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २३.०७.२०२० रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरवलेली असुन माहितीचा अर्ज निकाली काढलेला आहे, असे निदर्शनास आले आहे (प्रत सोबत जोडत आहे). तसेच सदर माहिती आपणांस अर्ज प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांत उपलब्ध करुन देणे अपेक्षित होते, परंतु कोवीड-१९ महामारीमुळे राज्यात लॉकडाउन असल्यामुळे आपला अर्ज दिनांक २३.०७.२०२० रोजी माहिती अधिकारी यांनी निकाली काढून आपणांस कळविले आहे.

करीता सदरहू अपिल ही निष्फळ आहे, व त्यानुषंगाने अपिल निकाली काढण्यात येत आहे. सदर अपील कोविड-१९ महामारीच्या प्रादुर्भावामुळे आज दिनांक ३०.०७.२०२० रोजी निकाली काढण्यात येत आहे.

**जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.**

<u>**निर्णय**</u>

अपिलार्थी यांची अपिल निकाली काढण्यात येत आहे.

**(अनिलकुमार उके)**
**संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी**

प्रति,
श्री. ब्रिजमोहन धिरजप्रसाद मिश्रा,
पेठ गल्ली, परळी वैजनाथ,
जि. बीड - ४३१५१५.

**(अनिलकुमार उके)**
**संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी**

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

**Maharashtra Electricity Regulatory Commission**

माहितीचा अधिकार

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

MERC/ADM/RTI/023/2020/298 Dt. 23.07.2020

To
Shri Brijmohan Dhirajprasad Mishra
Peth Galli, Parli Vaijnath,
Dist. Beed 431 515.

Subject : Your application dated 11.03.2020 submitted under RTI Act 2005.

The office of the Commission is in receipt of your application dated 16.03.2020 under section 6 (1) RTI Act 2005 seeking information by the PIO.

Your RTI application has referred and sought and provided the information as under:

**Point No 1 :-** Working group Committee Final report is available on the website of the Commission in downloadable format.

**Point No 2:-** The issue is addressed by the Commission in its MYT Order in Case No 322 of 2019 dated 30.03.2020. Kindly refer this MYT order.

Please note that the above report and Multi Year Tariff order are available in public domain on the Commission website in downloadable format on www.merc.gov.in. As per the Hon'ble CIC decision No. CIC/YA/A/2014/000379/SB Dated 19.09.2016 in the matter of Shri. K. Lal Vs M. K. Bagri, Assistant Registrar of Companies and CPIO, Appeal No. CIC/AT/A/2007/00112, dated 12.04.2007, since the same is available in public domain, the PIO is not obliged to provide the same to the appellant under the RTI Act.

Also note that your application is not disposed off within the time bond as per the RTI Act 2005. Because of all over States are lockdown due to COVID-19.

Shri Anil Kumar Ukey, Director (Legal) In-charge is the first Appellate Authority for the purpose of Appeal under Sub- Section (1) of section 19 of the Right Information Act, 2005. Address: Maharashtra Electricity Regulatory Commission, World Trade Centre, Centre No.1, 13th Floor, Cuffe Parade, Mumbai – 400005 Tel. No. 022-22163964/65/69. Email: anilkumar.ukey@merc.gov.in.

Yours faithfully,

(Pradeep Mohare)
Public Information Officer & Section Officer

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in **Website :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in

Scanned with CamSc